# ऐतिहासिक महत्व असलेल्या कोडोली जि. प. शाळेच्या पुनरुत्थानासाठी घेऊ पुढाकार

शिक्षणाचे आणि ज्ञानाचे महत्त्व देशभरात पोहोचविणाऱ्या या महाराष्ट्राच्या एकेकाळीच्या साताराजवळ कोडोली या गावी मेजर पांडुरंगराव रामचंद्रराव जाधव यांनी देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच अनेक वर्ष स्वतःची सहा एकर जमीन दान देऊन या जागेवर मुला- मुलींसाठी एकत्रित शाळा उभी केली.

कोडोली हे गावच जाधव घराण्याने वसविले. अर्थातच गावचे पाटील म्हणून त्याचे पालकत्वही या घराण्याकडे आले. मेजर जाधव हे इंग्रजांच्या सैन्यात मोठ्या हुद्द्यावर काम केलेले अधिकारी होते. मुठभर इंग्रज आपल्या बुद्धीचातुर्याच्या जोरावर जग पादाक्रांत करतात. इतकेच नव्हे तर जगावर राज्य करतात, यामागील कारणांचा मेजर जाधव यांनी बारकाईने मागोवा घेतला. इंग्रज जगाच्या पाठीवर कुठेही असले तरी त्यांच्या घरातील महिला सुशिक्षित असतात. पर्यायाने त्यांच्या घरातील मुलांना दर्जेदार शिक्षणाचे बाळकडू मिळते आणि ज्ञानाचा ध्यासही त्यांच्यामध्ये उत्पन्न होतो, ही बाब मेजर जाधव यांच्या ध्यानात आली.

अशीच शिक्षणाची संधी आपल्या भागातील मुलांना उपलब्ध व्हावी, त्यांच्यातही ज्ञानसंवर्धनाची आस निर्माण व्हावी, यासाठी मेजर जाधव यांनी आपली जमीन देऊन शाळा सुरु केली. ज्या काळात मुलींना आपल्या घराचा उंबरठा ओलांडण्यासही मज्जा होता, त्या काळात मुला मुलींना एकत्रित शिक्षण देणारी शाळा सुरु करणे ही एक प्रकारची क्रांतीच म्हटली पाहिजे. या शाळेचे स्थापना वर्ष सन 1904 हे होते एवढे सांगितले तरीही त्या कालच्या सामाजिक आणि शैक्षणिक परिस्थितीची जाणीव झाल्याशिवाय राहणार नाही.

कालांतराने मेजर जाधव यांची मुले, नातू व अन्य कुटुंबीय चरितार्थासाठी वेगवेगळ्या ठिकाणी विखुरले गेल्यामुळे शाळेच्या कारभारात लक्ष देण्यासाठी त्यांना उसंत मिळाली नाही. या शाळेचा कारभार जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत गेला. त्यानंतर मात्र विविध कारणाने या ऐतिहासिक महत्त्व असलेल्या शाळेची अधोगतीच सुरु झाली.

तब्बल सहा एकराचे आवार, 30 वर्गखोल्या, बाराशे विद्यार्थी क्षमता असलेली जिल्हा परिषदेची महाराष्ट्रातील ही एकमेव शाळा आहे. मात्र, सध्याच्या काळात या शाळेतील पटसंख्या घटली असून ती साडेआठशेवर आली आहे. ग्रामीण भागातील लोकांची ही आर्थिक प्रगती झाल्यामुळे आणि शिक्षणाचे महत्त्व अधिक प्रमाणात उमजल्यामुळे अनेक पालक आपल्या पाल्यांना जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकवण्याऐवजी नावाजलेल्या खाजगी शाळांमध्ये शिकवणी पसंत करीत आहेत. अर्थातच, ग्रामीण भागातील सर्वच पालकांना खाजगी शाळा परवडणे शक्य नाही. त्यामुळेच या शाळेत आजही साडेआठशे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.



कै. मेजर पांडुरंगराव रामचंद्रराव जाधव
जन्म : ५ जानेवारी १८८०
मृत्यू : १९ जानेवारी १९३९

गरीब कुटुंबातील मुलांना शिक्षणाची अधिक गरज असते. त्यासाठी त्यांची तळमळ अधिक असते, गुणवत्तेचीही कमतरता नसते. त्यामुळेच या शाळेतील विद्यार्थी शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा इतकेच काय राज्य आणि केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेत यश मिळवून मोठ्या अधिकार पदावर रुजू झाली आहेत, असे या शाळेचे संस्थापक मेजर जाधव यांचे पणतू संग्रामसिंह विजयसिंह जाधव हे सांगतात.

प्रत्यक्षात एवढी मोठी परंपरा आणि इतिहास असलेल्या या शाळेच्या पदरी प्रशासकीय पातळीवरुन उपेक्षाच येत आहे. एवढे मोठे आवार आणि क्रीडांगण लाभलेल्या या शाळेच्या जागेवर चहूबाजूंनी अतिक्रमण झाले आहे. संग्रामसिंह जाधव यांनी पुढाकार घेऊन यातील काही अतिक्रमण काढून घेण्यास भाग पाडले. मात्र कित्येक वर्षात शाळेच्या जागेची मोजणीच झालेली नाही. त्यामुळे शासनाने या जागेची मोजणी करुन घ्यावी आणि अतिक्रमणे काढून शाळेच्या ताब्यात संपूर्ण जमीन द्यावी, अशी मागणी जाधव यांनी केली आहे.

गोरगरिबांच्या या शाळेत शिकणाऱ्या साडेआठशे मुलांच्या भवितव्याचा विचार करुन संग्रामसिंह जाधव यांनी या ऐतिहासिक शाळेला महाराष्ट्रातील एक दर्जेदार शाळा म्हणून नावारुपाला आणण्याचा चंग बांधला आहे. आपल्या व्यवसायाची जबाबदारी आपले चिरंजीव आणि सूनबाई यांच्यावर सोपवून त्यांनी पूर्णवेळ शाळेच्या प्रगतीसाठी देण्याचा निर्धार केला आहे.

आर.सी.सी. इमारतीच्या छताची गळती दूर करावी, विद्यार्थ्यांसाठी नवीन बाके खरेदी करावी, मुला मुलींसाठी स्वच्छ, सुसज्ज प्रसाधनगृहे असावी, शाळेसमोर राज्य महामार्ग असल्याने विद्यार्थयांना सुरक्षितपणे ये जा करण्यासाठी स्काय वॉक असावा, रस्त्यावर गतिरोधक आणि शाळा असल्याचा दिशादर्शक फलक असावा, प्रवेशद्वारासमोर गटारे बंदिस्त करावी,

शाळेसाठी अद्ययावत विज्ञान प्रयोगशाळा, सांगणक कक्ष, ग्रंथालय, आभासी वर्ग, स्वयंपाक करण्यासाठी शेड, क्रीडा साहित्य ठेवण्यासाठी खोली, सांस्कृतिक सभागृह यासाठी 6 खोल्या असाव्या, सुरक्षेसाठी सीसी टीव्ही यंत्रणा असावी, कुंपण भिंतीची उंची वाढवावी, बंदिस्त व्हरांडे असावे, सुसज्ज संगणक प्रशिक्षण कक्ष व स्वतंत्र प्रशिक्षक असावा, विविध विषयांचे शिक्षक, कला, क्रीडा, कौशल्य प्रशिक्षक यांची रिक्त पदे त्वरित भरावी, क्रिडांगणावर 400 मीटर धावण्याचा ट्रॅक उभारावा, क्रीडासाहित्य उपलब्ध व्हावे, अशा अत्यंत न्याय्य मागण्यांचे निवेदन संग्रामसिंह जाधव यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्याधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांना दिले असून त्याचा नियमित पाठपुरावाही सुरु आहे. मात्र, अन्य तातडीच्या कामांमुळे प्रशासनाला गोरगरीब विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविणाऱ्या या कामाकडे लक्ष देण्यास वेळ नसल्याची खंत ते व्यक्त करतात. त्यामुळे जाधव यांच्या या कार्याला केवळ सातारकरच नव्हे तर शिक्षणाची आच असणाऱ्या आणि भावी पिढीच्या भवितव्याची काळजी असणाऱ्या प्रत्येकाने साथ देणे आवश्यक आहे.

**छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या वास्तव्याने पावन झालेल्या सातारा आणि परिसराला ज्याप्रमाणे समृद्ध असा ऐतिहासिक वारसा आहे त्याचप्रमाणे पुरोगामी विचारांचाही मोठा वारसा आहे. इथल्या माणसांच्या मनामनात आणि मातीच्या कणाकणात पुरोगामी विचार रुजला आहे. याच पुरोगामी विचाराच्या प्रभावाची साक्ष देणारी ऐतिहासिक महत्त्व असलेली एक वास्तू म्हणजे कोडोली येथील जिल्हा परिषदेची शाळा! महाराष्ट्रातील सर्वात जुनी आणि सर्वात मोठी जिल्हा परिषदेची शाळा असूनही आज या शाळेला उपेक्षेला सामोरे जावे लागत आहे. या शाळेला गतवैभव प्राप्त व्हावे यासाठी शाळेच्या संस्थापकांचे वंशज पोटतिडकीने करीत असलेल्या प्रयत्नांना सुजाण सातारकरांनी नेटाने साथ देणे गरजेचे आहे.**



**श्री. एस. व्ही. जाधव**
उद्योजक


# जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा कोडोली



## ITS,MTS आणि अभिरूप स्पर्धा परीक्षा २०२४ मधील गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन



| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शिवम कदम (200/200) राज्यात पहिला | तन्मय शिंदे (200/200) राज्यात पहिला | श्लोक साळुंखे (200/200) राज्यात पहिला | आराध्या घाडगे (198/200) राज्यात दुसरी | रिशांक जाधव (198/200) राज्यात दुसरा | आराध्या जाधव (198/200) राज्यात दुसरी | आरोही जाधव (198/200) राज्यात दुसरी | प्राथ्वी जमदाडे (198/200) राज्यात दुसरी | अंकित जाधव (196/200) राज्यात तिसरा | अद्युत लोकरे (192/200) राज्यात पाचवा |



| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| निरंजन घोरपडे (192/200) राज्यात पाचवा | सत्यजित साबळे (192/200) राज्यात पाचवा | श्रीनिका कुंभार (188/200) जिल्ह्यात दुसरी | सार्थक जाधव (190/200) जिल्ह्यात प्रथम | गौरवी जाधव (190/200) जिल्ह्यात प्रथम | साईराज सस्ते (190/200) जिल्ह्यात प्रथम | गायत्री पवार (184/200) जिल्ह्यात चौथी | रुद्र कोरडे (184/200) जिल्ह्यात चौथा | आरव जाधव (184/200) जिल्ह्यात चौथा | आराध्या साळुंखे (176/200) जिल्ह्यात आठवी |





| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आराध्या भोसले (176/200) जिल्ह्यात आठवी | तन्वी तांगडे (174/200) जिल्ह्यात नववी | नवमी मुंढे (172/200) जिल्ह्यात दहावी | राजलक्ष्मी चव्हाण (172/200) जिल्ह्यात दहावी | तोसिफ मुलाणी (170/200) केंद्रात पहिला | सायली दिवटे (170/200) केंद्रात दुसरी | असीम पठाण (164/200) केंद्रात चौथा | दिव्या साखरे (164/200) केंद्रात चौथी | वेदिका चव्हाण (162/200) केंद्रात पाचवी |

मार्गदर्शक शिक्षक
**श्री. सूर्यकांत देशमुख सर**

**इयत्ता १ ली प्रवेश सुरू...** यादव मॅडम (९४२३३५५६३५), साळुंखे मॅडम ७५५८५४८७७३, कुंभार मॅडम ९५११२०२३६८

**शुभेच्छुक : अशोक जांभळे (मुख्याध्यापक), मनिषा साळुंखे (अध्यक्ष), उषा जाधव(उपाध्यक्ष), शिवाजी जाधव (लालासर)**

## शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व सर्व पालक, दत्तनगर, कोडोली.